**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१४ मधील निशाण ७१ वरील आदेश**

CNR: MHSI05-000229-2014

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांचे मार्फत त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द बातल करुन दाव्याचे कामी कैफियत सामील करण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की प्रतिवादी नं. ३६ ने त्यांची कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे. प्रतिवादीने दाखल केलेला प्रतिदावा हा या न्यायालयाच्या आर्थिक अधिकार क्षेत्राबाहेरील असून त्या संदर्भात वादीने प्रस्तुत दाव्यात 'प्राथमिक मुद्दा' काढणेकरीता अर्ज दाखल केलेला होता. परंतु दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम ९अ कमी करणेत आलेमुळे सदर अर्ज दाखल करणेत आला. वादीने दाखल केलेल्या प्राथमिक मुद्दयासंदर्भातील अर्जामध्ये यश मिळण्याची वादीस खात्री होती व प्रतिवादीचा प्रतिदावा नाकारण्यात आला असता या विश्वासावर वादी राहिल्यामुळे वादीने प्रतिवादीतर्फे दाखल प्रतिदाव्यावर त्यांची कैफियत दाखल केली नाही. परिणामी वादी विरुध्द कैफियत नाही चा आदेश करण्यात आला. सदर कैफियत दाखल करुन घेतली न गेल्यास वादी यांचेवर अन्याय होणारा आहे. सबब विना कैफियत आदेश रद्द होवून वादीला त्यांची कैफियत दाव्याचे कामी सामिल करण्यास परवानगी दयावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

२. या अर्जावरच प्रतिवादी नं. ३ तर्फे म्हणणे देण्यात आलेले असून त्याने संपुर्ण अर्जाचे खंडणे केलेले आहे. त्याने असे नमूद केले आहे की रे.दि.मु.नं. १९/२०१६ हा दावा दाखल करण्यात आलेला असून त्यामध्ये वादी याने दोन्ही दावे एकत्र चालावेत म्हणून निशाण ३८ येथे अर्ज दिलेला आहे. तसेच रे.दि.मु.नं. १९/२०१६ मध्ये यातील प्रतिवादी यांनी नि. २६ येथे दिनांक १४/२/२०१८ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. मात्र उलटतपास अद्यापही घेतलेला नाही. याकामी प्रतिवादी यांनी निशाण ३६ येथे दिनांक २८/१/२०१५ रोजी कैफियत व उलटमागणी दावा दिलेला आहे. उलट मागणी दाव्यावर कैफियत देण्यास ४ वर्षाहून अधिक काळ का लागला याचे कारण वादीने दिलेले नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी प्रतिवादीने नं. ३ ने केली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं. ३ ने या परिस्थितीप्रमाणे वादीच्या विरुध्द झालेल्या आदेशाची माहिती सांगितलेली आहे. त्याप्रमाणे वादीविरुध्द

आदेश झालेला आहे.  सबब वादीकडून कैफियत देण्यास बराच विलंब झालेला आहे यात काही वाद नाही. तरी देखील नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करुन वादीला संधी देणे मला उचित वाटते.  मात्र, त्याचवेळेस झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादी नं. ३ला खर्चाची रक्कम देणे उचित रहाणार आहे. सबब प्रतिवादी नं. ३ यांना रुपये ३,५००/— वादीकडून देणे उचित रहाणार आहे.  सबब मी खालील आदेश पारित करतो.

१. वादीचा अर्ज प्रतिवादी नं. ३ ला रक्कम रुपये ३,५००/— देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुतची रक्कम पुढील तारखेपर्यंत वादीने भरावयाची आहे. रक्कम न भरल्यास आदेश आपोआप रद्द समजण्यात येईल याची नोंद वादीने घ्यावी.

३. सबब वादीने आदेशाची पुर्तता करावी. पुर्तता केल्यावर त्यांची कैफियत या कामामध्ये दाखल करुन घेण्यात येईल.

सही/—

दिनांक— १२/०६/२०१९

विनायक द. पाटील

दिवाणी न्यायाधीश क.स्तर वेंगुर्ला.